# देशात महाविद्यालयांचे शैक्षणिक वर्ष नोव्हेंबरपासून

## मनुष्यबळ विकास मंत्रालय व युजीसीच्या बैठकीत निर्णय

लोकमत न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** विद्यापीठ आणि महाविद्यालयांचे शैक्षणिक वर्ष नोव्हेंबरपासून सुरु करावे, असा निर्णय मनुष्यबळ विकास मंत्रालय व युजीसीच्या बैठकीत मंगळवारी रात्री उशिरा घेण्यात आला.

मनुष्यबळ विकास मंत्री रमेश पोखरियाल निशंक यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक झाली. दरम्यान, दिल्ली विद्यापीठामध्ये ओपन बुक परीक्षा १५ ऑगस्टनंतरच होणार आहे. तसेच विद्यापीठांमध्ये ३० सप्टेंबरपर्यंत अंतिम वर्षाच्या परीक्षा पूर्ण करून ऑक्टोबर किंवा नोव्हेंबरपर्यंत निकाल जाहीर करावेत, अशी अपेक्षा आहे. त्यानुसार सर्व विद्यापीठ आणि महाविद्यालयांमधून नोव्हेंबरमध्ये शैक्षणिक सत्र सुरु होईल, असेही बैठकीत सांगण्यात आले.

**विद्यापीठ प्रवेश प्रक्रिया दीर्घकाळ...**

जेईई-नीट परीक्षांचे निकाल लागेपर्यंत विद्यापीठांची प्रवेश प्रक्रिया सुरु ठेवावी, असा निर्णयही मनुष्यबळ विकासमंत्री निशंक यांच्या अध्यक्षतेखालील बैठकीत घेण्यात आला आहे.

# अंतिम वर्षाच्या परीक्षा नाहीतच

## राज्य सरकार निर्णयावर ठाम : युजीसीने फेरविचार करावा : उदय सामंत

प्रतिनिधी
**मुंबई**

कोरोनाचा वाढता प्रादुर्भाव पाहता सप्टेंबरपर्यंत परीक्षा घेणे शक्य नाही. त्यामुळे अंतिम वर्षाच्या परीक्षा होऊ नयेत, या भूमिकेवर राज्य सरकार ठाम असल्याचे उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत यांनी बुधवारी स्पष्ट केले.

विद्यापीठ अनुदान आयोगाने महाराष्ट्रातील अंतिम वर्षाच्या परीक्षा रद्द करण्यात येणार नसल्याचे जाहीर केल्यानंतर सामंत यांनी याबाबत भूमिका मांडत नाराजी व्यक्त केली. आपण विद्यार्थ्यांच्या जीवाशी खेळतोय, याचे भान असले



पाहिजे. सप्टेंबरमध्ये परीक्षा घेण्याचा केंद्र सरकारचा निर्णय धक्कादायक आहे. राज्यातील बहुतांश विद्यालयांचे रुपांतर क्वारंटाईन सेंटरमध्ये केले आहे. अशावेळी परीक्षा घ्यायच्या कशा, असा सवाल ही सामंत यांनी उपस्थित केला.

याबाबत केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, सचिव उच्च शिक्षण भारत सरकार आणि विद्यापीठ अनुदान आयोगाचे अध्यक्ष डी. पी. सिंग यांना पत्र पाठवून महाराष्ट्र हे सर्वाधिक बाधित राज्य आहे. सध्याच्या परिस्थितीमध्ये अंतिम वर्ष सत्राच्या दहा लाखांपेक्षा अधिक विद्यार्थ्यांची परीक्षा घेणे जिकरीचे आहे, असे सांगितल्याचे ते म्हणाले. २० एप्रिलला युजीसीने मार्गदर्शक सूचना दिल्या होत्या. परिस्थिती पाहून अंतिम परीक्षेबाबत निर्णय घ्यावा, असे सांगितले. एप्रिल–मेमध्ये दिलेल्या पत्रानंतर आम्ही पहिल्या वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी काही निर्णय घेतले. त्यानंतर यूजीसीने कोणतेही पत्र पाठवले नाही. आता युजीसीने ऑनलाईन परीक्षा घेण्यास सांगितले आहे.

# विद्यापीठे, शैक्षणिक संस्थांचे सत्र नोव्हेंबरपासून

## केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालयाचे निर्देश

**नवी दिल्ली : पुढारी वृत्तसेवा**

कोरोना महारोगराईच्या पार्श्वभूमीवर देशभरातील विद्यापीठे तसेच स्वायत्त विद्यापीठे आणि शैक्षणिक संस्थांमधील २०२०-२१ चे शैक्षणिक सत्र नोव्हेंबर महिन्यापासून सुरू करण्याचे निर्देश मंत्रालयाकडून देण्यात आले आहेत. केंद्रीय मनुष्यबळ विकासमंत्री रमेश पोखरियाल निशंक यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालय, विद्यापीठ अनुदान आयोग (यूजीसी) तसेच इतर अधिकाऱ्यांसोबत झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला आहे.

**• नीट, जेईईचा निकाल येईस्तव प्रवेश प्रक्रिया सुरू ठेवण्याचे आदेश**

कुठलाही विद्यार्थी उच्च शिक्षणापासून वंचित राहू नये याकरिता, जेईईची मुख्य परीक्षा तसेच नीट-२०२० परीक्षेचा निकाल येईस्तव दिल्ली विद्यापीठासह देशातील सर्व विद्यापीठांना प्रवेश प्रक्रिया सुरू ठेवावी लागेल, असे निर्देश मंत्रालयाकडून देण्यात आले आहेत.

यापूर्वीच 'यूजीसी'ने देशातील विद्यापीठे, स्वायत्त विद्यापीठे तसेच महाविद्यालयांना ३० सप्टेंबरपर्यंत अंतिम वर्षांची परीक्षा घेण्याचे आदेश दिले आहेत. या आदेशांन्वये ऑक्टोबर अथवा नोव्हेंबरपर्यंत परीक्षेचे निकाल जाहीर केले जाऊ शकतात. यामुळे विद्यापीठे तसेच महाविद्यालयांतील २०२० चे शैक्षणिक सत्र नोव्हेंबरपर्यंतच सुरू होऊ शकणार आहे.

'यूजीसी'च्या संशोधित मार्गदर्शक तत्त्वांनुसार दिल्ली विद्यापीठातील खुली प्रवेश परीक्षा १५ ऑगस्टनंतर घेण्यात येईल. दिल्ली विद्यापीठाला १० जुलैपासून सुरू होणाऱ्या परीक्षा एक महिन्यासाठी पुढे ढकलण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.